# अती कोमल

विशाल तुझे नयन
सागर दयेचे दोन
मोहक तुझे अधर
पाझरे स्मित मधुर

शिरी पीस गंध भाळी
गळा माळ उरी मणी
पीतांबर पट्टा कटी
करी पावा तोडा पायी

आकर्षक मूर्ती तव
ठसे माझ्या नयनात
दृष्टी आपादमस्तक
फिरे खिळे पायावर

सारीच काया कोमल
चरण अती कोमल
लाजेने कमलदल
घाली मिठीच घट्ट

– नारायण
११/०४/२३